सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १५७ | शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



आजचे अभीष्टचिंतन





**श्री. विलास बारी**
जेष्ठ पत्रकार



**श्री. गणेश ठाकरे**
कॉन्ट्रॅक्टर



**श्री. प्रभाकर भामरे**
सर्पमित्र



**श्री. प्रवीण सोनार**
अमळनेर




**श्री. सुनील मोरे**
अमळनेर


# जळगावच्या ४५ हजार शेतकऱ्यांचे नशीब उजळणार

## सरकारने मागविली माहिती; शेतकरी कर्ज निवारण योजनेचा असा होणार फायदा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील शेतकरी कर्जमाफी प्रक्रियेला गती मिळाल्याचे संकेत दिसून येत आहेत. थकीत पीक कर्जदार शेतकऱ्यांची यादी तयार होत असून, या अर्थसंकल्पात यासंदर्भात मोठी घोषणा होण्याची शक्यता आहे. जळगाव जिल्ह्यातील विकास सोसायट्यांतर्गत सुमारे ४० हजार व थेट कर्जपुरवठा झालेले ५ हजार असे एकूण ४५ हजार शेतकरी मार्च २०२५ नंतर थकीत आहेत. मार्च २०२५ वा त्या अगोदरच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासंदर्भात शासनाने ऑगस्ट २०२५ नंतर माहिती मागविली होती. त्यानुसार 'शेतकरी कर्ज निवारण योजना २०२६'अंतर्गत शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. जिल्ह्यात २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त



शेतकऱ्यांना तब्बल २९९ कोटींपेक्षा अधिकचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे. हे अनुदान तुटपुंजे असले तरी यंदा २०२५ पर्यंतच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासंदर्भात शासनाने ऑगस्ट २०२५नंतर माहिती मागविली होती. यापूर्वी तत्कालीन भाजपच्या सरकारने २०१८ दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेदरम्यान पीककर्ज माफी व नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाचा लाभ दिला होता. त्याचप्रकारे यावेळी देखील नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन लाभ देत दिलासा मिळण्याची चिन्हे दिसून येत आहेत. मात्र अर्थसंकल्पात होणाऱ्या तरतुदींनंतरच अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. जिल्ह्यात २०२४-२५ दरम्यान जिल्हा बँकेंतर्गत एक लाख ७५ हजार शेतकऱ्यांना विकास सोसायट्यांतर्गत एक हजार ५२ कोटी रुपयांचा पीककर्ज पुरवठा देण्यात आला होता. त्यापैकी एक लाख ३५ हजार शेतकऱ्यांनी परतफेड केली आहे. ४१ हजार शेतकऱ्यांना जिल्हा बँकेकडून थेट पीककर्ज पुरवठा झाला होता. त्यातील ३६ हजार शेतकऱ्यांनी परतफेड केली आहे. विकास सोसायटीचे ४० हजार व थेट कर्जपुरवठा असे पाच हजार मिळून सुमारे ४५ हजार शेतकरी २०२५ मार्चनंतर थकीत आहेत.

### राष्ट्रीयीकृत बँकांचा हात आखडता

जिल्हा बँकेसह राष्ट्रीयीकृत व अन्य खासगी बँकांना २०२५-२०२६ अंतर्गत सुमारे चार हजार १७६ कोटी ९३ लाख रुपये कर्ज वितरणाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी जिल्हा बँकेने खरीप व रब्बी हंगामांतर्गत १,०८० कोटी ८६ लाखांपैकी एक लाख ६४ हजार ९६८ शेतकरी सभासदांना एक हजार ८५ कोटी दोन लाखांचे सरासरी १५० टक्क्यांहून अधिक कर्ज वितरण केले आहे. राष्ट्रीयीकृत बँकांना २,१७४ कोटी ३५ लाख रुपये कर्ज वितरणाचे उद्दिष्ट होते. मात्र, उद्दिष्टापैकी केवळ ५०८ कोटी ४२ लाखांचे सरासरी २३.३८ टक्केच कर्ज शेतकऱ्यांना दिले आहे. यात ग्रामीण बँकांचा शेतकरी कर्जवितरणात थोडाफार हातभार असून, त्यांनी ५३ कोटी २५ लाख उद्दिष्टांपैकी ३२ कोटी ५९ लाख सरासरी ६१.२० टक्के पीककर्ज वितरीत केले आहे. खासगी बँकांनी ८६८ कोटी ४७ लाखांपैकी २२३ कोटी १७ लाख म्हणजेच २५.७० टक्के कर्ज वितरण केले आहे. एकूणच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची कर्जवितरणात व वसुलीतही आघाडी आहे. परंतु राष्ट्रीयीकृत व खासगी बँकांचा मात्र हात आखडता आहे.

> **कर्जमाफी न मिळाल्यास शेतकरी जबाबदार**
>
> जिल्हा उपनिबंधक, बँकेचे संचालक व कार्यकारी संचालकांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे, की आधार कार्डची प्रत व बँक खाते क्रमांकाचा पुरावा (पासबुक/चेक) आपल्या गावाच्या विविध कार्यकारी सहकारी संस्थेत (सोसायटी) किंवा जिल्हा बँकेच्या जवळच्या शाखेत सादर करावेत. वेळेत कागदपत्रे न दिल्यास कर्जमाफी मिळणार नाही व त्यास शेतकरी स्वतः जबाबदार राहतील. यात बँक किंवा सोसायटीची कोणतीही कायदेशीर जबाबदारी राहणार नाही, असे जिल्हा बँकेच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.

### शेतकऱ्यांची बँकेची माहिती रिकामी

मार्च २०२५ दरम्यान थकीत असलेल्यांना 'शेतकरी कर्जनिवारण योजना २०२६'अंतर्गत लाभ मिळणार असला तरी तब्बल ४५ हजार शेतकऱ्यांपैकी २६ हजार ४३७ शेतकऱ्यांची कर्जमाफी आता तांत्रिक कारणामुळे टांगणीला लागली आहे. ऑगस्ट २०२५ नंतर राज्य शासनाने थकीत पीक कर्जदार शेतकऱ्यांची तांत्रिक माहिती मागविली होती. त्यानुसार जिल्हा बँकेने वारंवार आवाहन करूनही या २६,४३७ शेतकऱ्यांनी अद्याप त्यांचे आधार कार्ड व बँक खात्याचा तपशील सादर न केल्याने जिल्हा बँकेच्या पोर्टलवर त्यांची नोंदणी रखडली आहे.

# ढेकू रोड बुडाला अंधारात; दीपकनगरपुढील दिवे बंद!

## ८० फुटी रस्त्यावर दारूड्यांचा वावर; त्रस्त नागरिकांची कारवाईची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील ढेकू रोड परिसरातील दीपकनगरच्या पुढील भागात रस्त्यावरील अनेक दिवे बंद असल्याने संपूर्ण परिसर अंधारात बुडाल्याचे चित्र आहे. जे काही दिवे सुरू आहेत त्यांच्यावर झाडाझुडपांचे जाळे पसरले आहे. त्यामुळे प्रकाश रस्त्यावर पडत नसून नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या ८० फुटी रस्त्यावर कायम दारूड्यांचा वावर असल्याने नागरिक त्रस्त आहेत. संबंधितांनी याकडे लक्ष देऊन कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार वीज कर्मचारी दिवे सुरू करून जात असले, तरी काही असामाजिक



*अमळनेर : ढेकू रोड परिसरातील दीपकनगरच्या पुढील भागात रस्त्यावरील अनेक दिवे बंद असल्याने अंधारमय स्थितीतील संपूर्ण परिसर.*

प्रवृत्तीचे लोक मुद्दाम वीजपुरवठा खंडित करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे अंधाराचे साम्राज्य कायम राहत असते. दरम्यान, ९० फुटी रस्त्यावर रात्रीच्या वेळी दारू पिऊन सिगारेट ओढणारे टोळके अंधारातच बसलेले असतात, तर काही बेधुंद स्थितीत फिरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ढेकू रोड हा सायंकाळी व जेवणानंतर फिरण्यासाठी नागरिकांचा आवडता मार्ग मानला जातो. सुमारे ९० टक्के नागरिक या रस्त्यावरून चालण्याचा व्यायाम करतात. मात्र अंधार आणि दारू पिऊन बसलेल्या व्यक्तींमुळे अनेकांनी सद्यःस्थितीत दीपकनगरपुढे जाणे टाळणे सुरू केले आहे. अंधाराचा फायदा घेत अवैध प्रकार घडण्याचीही शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.


वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन तत्काळ बंद दिव्यांची दुरुस्ती करून झाडाझुडपांची छाटणी करावी. तसेच पोलीस प्रशासनानेही या ८० फुटी रस्त्यावर दारू पिऊन वावरणाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी जोर धरत आहे.

# अमळनेरच्या समृद्धी सुहागीरने मिळविले 'जेईई मेन्स' परीक्षेत ९८.९३ पर्सेंटाईल

## अभियांत्रिकीच्या क्षेत्रात करिअर करण्याचा निर्धार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास कायम ठेवल्यास नक्कीच यश आपल्याला मिळते, या प्रचितीचे उत्तम उदाहरण म्हणजे येथील विद्यार्थिनी समृद्धी योगेश सुहागीर होय. समृद्धीने जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या जेईई मेन्स परीक्षेत ९८.९३ पर्सेंटाईल मिळवत उज्ज्वल यश मिळविले आहे. तिने विषयनिहाय भौतिकशास्त्र- ९५.४८, रसायनशास्त्र- ९६.६०, तर गणित विषयात- ९९.६८ पर्सेंटाईल मिळविले आहेत. विशेष म्हणजे गणित विषयात तिने मिळविलेले ९९.६८ पर्सेंटाईल म्हणजे तिची असलेली भक्कम पकड सिद्ध करणारी आहे. या यशासाठी अभ्यासाचे नियोजनबद्ध वेळापत्रक आणि स्वअनुशासन त्याचप्रमाणे आई-वडिलांचे



श्रम आणि त्यांचा विश्वास हेच माझे खरे बळ आहे, असे समृद्धी नम्रपणे सांगते.

समृद्धीने पीबीए इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दहावीत असताना ९३ टक्के गुण मिळविले आहेत. सध्या ती मुंदडा उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीचे शिक्षण घेत आहे. अभ्यासासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी करत तिने आपला ध्यास जपला. तिचे पुढील लक्ष्य जेईई ॲडव्हान्स उत्तीर्ण होऊन देशातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळविणे आहे. भविष्यात ती अभियांत्रिकीच्या क्षेत्रात करिअर करण्याचा निर्धार बाळगून आहे. या यशासाठी विनोद यादव, रोषण कुमार, मुनिस तुल, इस्लाम मट्टू, अनुज पाल यांचे बहुमोल मार्गदर्शन समृद्धीला लाभले. समृद्धीचे वडील योगेश आनंदराव सुहागीर यांचा परिवार (रोहित तबला सेंटर, पैलाड, अमळनेर) गेल्या तीन-चार पिढ्यांपासून पारंपरिक व्यवसायात कार्यरत आहेत.

या यशाबद्दल वत्साई एज्युकेशन सोसायटी संचलित पर्ल इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन नानासाहेब चंद्रकांत भदाणे, धनराज पाटील, भास्कर पाटील, दीपक पाटील, पत्रकार ईश्वर महाजन, दै. ग्लोबल महातेज परिवार तसेच अनेक मान्यवरांनी समृद्धीचे अभिनंदन केले असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


## दिनविशेष

२७ फेब्रुवारी

- मराठी भाषा गौरव दिन
- चांदीपूर तळावर जमिनीपासून आकाशापर्यंत अनेक लक्ष्यांवर मारा करू शकणाऱ्या स्वदेशी विकसित आकाश क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.
- 'विष्णू वामन शिरवाडकर' 'कुसुमाग्रज' यांचा जन्म, त्यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी,२०१३ रोजी घेण्यात आला

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

**जय भारत...! जय स्वदेशी...!!**



# अमळनेरमध्ये ८ मार्चला उपनयन सोहळा

## श्री ज्ञानेश्वर पाठशाळेचा ४४ वर्षांपासूनचा उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पाठक गल्लीतील श्री ज्ञानेश्वर पाठशाळेतर्फे रविवार, दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता सामुदायिक उपनयन (व्रतबंध) संस्कार अर्थात मुंज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मंगल सोहळा वाडी चौकातील श्री संत सखाराम महाराज भक्त निवासात होईल. प. पू. ह.भ.प. संतश्री सद्‌गुरू प्रसाद महाराज यांचे याप्रसंगी उपस्थितांना आशीर्वाद लाभणार आहेत. दरम्यान, या मंगल सोहळ्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक असून, रमेश जोशी (९०२८६ ८८९२८) यांच्याशी संपर्क साधावा.

भारतीय संस्कृतीतील सोळा संस्कारांपैकी नववा संस्कार म्हणून उपनयनाला



विशेष महत्त्व आहे. जीवनात शिस्त, संस्कार व आध्यात्मिक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश या संस्कारातून दिला जातो. गेल्या ४४ वर्षांपासून श्री ज्ञानेश्वर पाठशाळेतर्फे हा सोहळा विनामूल्य आयोजित करण्यात येतो. आतापर्यंत ११०० हून अधिक बटूंवर उपनयन संस्कार यशस्वीरीत्या झाले आहेत. या मंगल सोहळ्यास सर्व समाजबांधवांनी सहपरिवार उपस्थित राहून बटूंना शुभाशीर्वाद द्यावेत, तसेच दुपारी १२ ते ३ या वेळेत आयोजित भोजन प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# अमळनेरमध्ये आज संकीर्तन, निशाण यात्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : फागुन महोत्सवानिमित्त शुक्रवारी, दि. २७ फेब्रुवारी रोजी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात श्री श्यामजी संकीर्तन व भव्य निशाण यात्रेचा समावेश आहे. निशाण यात्रा प्रथमच शहरात निघणार आहे. ही यात्रा सकाळी ८ वाजता न्यू प्लॉट, भागवत रोडवरील महादेव मंदिरापासून निघेल. तसेच श्री श्यामजी भव्य संकीर्तन न्यू प्लॉट महाराणा प्रताप मार्ग येथे सायंकाळी सात वाजता सुरू होणार आहे. भव्य दरबार-इत्र वर्षा, अखंड ज्योत-छप्पन भोग व फुलांची होळी हे मुख्य आकर्षण असेल. जानव्ही दिघे (सुरत) व प्रदीप परमार (इंदूर) हे संकीर्तन सादर करणार आहे. नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक लखतदार भक्त परिवार व श्यामप्रेमी भक्त परिवाराने केले आहे.

# ॲड. चंद्रभान पाटील यांची अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धेत दिमाखदार कामगिरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिखर अकॅडमी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक ॲड. चंद्रभान पाटील यांनी टाटा अल्ट्रा मॅरेथॉनमधील स्पर्धेत ५० किलोमीटरचे अंतर अवघ्या ५ तासांत पूर्ण करून भरीव यश संपादन केले आहे. सह्याद्री पर्वतरांगांतील डोंगर- दऱ्या व टेकड्यांमधून पार पडणारी ही स्पर्धा अत्यंत आव्हानात्मक मानली जाते. आशिया खंडातील प्रतिष्ठित अल्ट्रा मॅरेथॉन म्हणून या स्पर्धेची ओळख आहे.


अवघ्या एका वर्षात अल्ट्रा रनर होण्याचा मान मिळवणारे ॲड. चंदभान पाटील हे अमळनेरच्या इतिहासातील पहिले अल्ट्रा रनर तसेच वेगवान धावपटू ठरले आहेत. यापूर्वी त्यांनी ४२ किमी मॅरेथॉन ३ तास ५५ मिनिटांत पूर्ण केली आहे. तसेच २१ किमीच्या ७ हाफ मॅरेथॉन पूर्ण केल्या असून त्यातील सर्वोत्तम वेळ १ तास ४२ मिनिटे अशी





नोंदवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे ते दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या जगप्रसिद्ध व प्रतिष्ठित मॅरेथॉन स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. जगातील सर्वात मोठ्या अल्ट्रा मॅरेथॉनपैकी एक मानल्या जाणाऱ्या या स्पर्धेत सहभागी होणे ही अभिमानाची बाब मानली जाते.

नोव्हेंबर २०२६ मध्ये राजस्थान येथे होणाऱ्या १०० किमी बॉर्डर रनमध्येही ते सहभागी होणार आहेत. जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर शिक्षक ते इंटरनॅशनल रनर असा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे.



# हरभरा खरेदी करण्यासाठी 'नाफेड'तर्फे नोंदणी सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : केंद्र सरकार 'नाफेड'च्या माध्यमातून हरभरा खरेदी करणार आहे. त्यासाठी येत्या १ मार्च २०२६ पासून नोंदणी सुरू होणार आहे, अशी माहिती बाजार समितीचे सचिव डॉ. उन्मेष राठोड यांनी दिली. बाजारात गावठी हरभऱ्याला ४ हजार ८०० ते ५ हजार ३०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे. मात्र, 'नाफेड'ने प्रतिक्विंटल ५ हजार ८७५ रुपये भाव जाहीर केला आहे. हरभरा विक्रीसाठी १ मार्चपासून ऑनलाईन नोंदणी सुरू होणार आहे. शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२६ पर्यंत नोंदणी करता येईल. त्यासाठी पीक पेरा लावलेला डिजिटल सातबारा, आधार कार्ड, बँक पासबुक आणि भ्रमणध्वनी क्रमांक देणे आवश्यक आहे.

## संपादकीय

### वास्तव स्थितीचे भान

अर्थसंकल्प हा जमा-खर्चाच्या ताळेबंदापुरता नसतो, तर उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या देशाच्या साऱ्या आकांक्षा-अपेक्षांचा विचार करून तयार केलेला पथदर्शी आराखडा असतो, या उक्तीचा प्रत्यय यावेळच्या केंद्रीय अर्थसंकल्पात अधिक ठळकपणे जाणवतो. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकताच सादर केलेल्या आपल्या सलग नवव्या अर्थसंकल्पाकडे (२०२६-२७) त्या दृष्टिकोनातून पाहावे लागेल. जागतिक परिस्थितीचे वास्तवभान राखून आणि भारताच्या दूरगामी वाटचालीचा विचार करून साकारलेला हा ऐवज आहे. युद्धे आणि 'व्यापारतंटे' सुरू असताना त्याची झळ कमी-अधिक प्रमाणात सर्वच देशांना बसते आहे. भारत त्याला अपवाद नाही. अर्थसंकल्पात या आव्हानाचे ठळक प्रतिबिंब पडले आहे. जागतिक पातळीवर अनिश्चित परिस्थिती असल्याने देशांतर्गत क्षमतांचा विकास करण्यावर आणि जिथे प्रगतीच्या शक्यता जास्त आहेत, त्या क्षेत्रांना पाठबळ देण्यावर अर्थमंत्र्यांचा भर आहे. त्यांनी जाहीर केलेल्या घोषणा आणि योजनांवर नजर टाकली तर ही बाब प्रकर्षाने जाणवते. योग आणि आयुर्वेदाचे महत्त्व जगभर वाढत असून या 'सॉफ्ट पॉवर'चा उपयोग करण्याचा विचार रास्त आहे. तीन आयुर्वेद संस्था स्थापन करण्याचे सूतोवाच अर्थमंत्र्यांनी केले. बिहार, हिमाचल प्रदेश, ईशान्य भारत, उत्तराखंड आदी भागांत पायाभूत पर्यटनसुविधांचा विस्तार आणि विकासाचा संकल्प करण्यामागेदेखील दूरदृष्टी आहे. बौद्ध धर्माची अनेक पवित्र स्थाने भारतात आहेत. चीन, जपान, थायलंड, श्रीलंका, व्हिएतनाम, दक्षिण कोरिया इत्यादी आशियायीच नव्हे तर अमेरिका, युरोपातूनही यासाठी भाविक भारतात येतात. पायाभूत सुविधांचा विकास झाल्यास पर्यटकसंख्या वाढू शकते. ईशान्य भारतातही पायाभूत संरचनांचा विस्तार करण्याने दोन उद्देश साध्य होतात. पर्यटन वाढायला मदत होते; त्याचबरोबर तेथील ऊर्वरित भारतातील नागरिकांचा वावर वाढतो. या भागात चीनच्या कुरापती लक्षात घेता याची खूपच आवश्यकता आहे.

गिर्यारोहण, प्रस्तरारोहणासाठी सरकारकडून पाठबळ मिळणे हे स्वागतार्ह. अमेरिका व चीनवरचे अवलंबित्व कमी करण्याचा दृष्टिकोन ठेवून इलेक्ट्रिक वाहने, मोबाईल आदीसाठी लागणाऱ्या दुर्मीळ खनिजांसाठी (रेअर अर्थ) केरळ, तमिळनाडू, आंध्रप्रदेशात उत्खननास दिलेले प्रोत्साहन; तसेच सेमीकंडक्टरसाठी चाळीस हजार कोटी रुपयांची तरतूद या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. प्रशिक्षण आणि कौशल्यविकासावर दिलेला भरही स्पर्धात्मक जगात आवश्यक आहे. किंबहुना व्यापारयुद्धाच्या काळात आपल्या वस्तू व सेवांचा दर्जा उंचावणे ही एक मोठे आव्हान आहे. भारताने युरोपीय महासंघाशी केलेल्या करारातून ज्या संधी उपलब्ध होणार आहेत, त्यांचा फायदा घेण्यासाठी सज्ज होण्याचा दृष्टिकोनही अर्थमंत्र्यांच्या भाषणातून प्रतीत झाला. वस्त्रोद्योगातील आपली स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी या उद्योगाला लागणाऱ्या विविध वस्तू, सुटे भाग यांच्यावरील आयातशुल्कात घट करण्यात आली आहे. त्याचा या क्षेत्रातील निर्यातवाढीसाठी उपयोग होऊ शकेल. जास्त नफा मिळवून देणाऱ्या चंदन, बदाम पिकांसाठी; तसेच तृणधान्ये, पशुसंवर्धन, मत्यउद्योग यांसाठी केलेल्या तरतुदी शेतीपूरक उद्योगांच्या विकासासाठी लाभदायक ठरतील. शेतीविकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी सरकार करीत असलेली उपाययोजनाही स्तुत्य आहे. त्यामुळे हवामान अंदाज, पीकनियोजन, बाजारभावांची नेमकी माहिती; किंबहुना शेतीवर येणाऱ्या सर्वच संकटांची पूर्वसूचना मिळू शकेल.

'भारत विस्तार' ॲप तयार करण्यात आला असून तो बहुभाषिक आहे. या प्रयत्नांतून शेतीची उत्पादकता वाढेल. जलमार्ग वाहतूक वाढवणे; तसेच पुणे-मुंबईसह विविध शहरांसाठी 'हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर'ची कल्पनाही विकासाला चालना देण्यास उपयुक्त ठरेल. औद्योगिक विकेंद्रीकरण, लघु व मध्यम उद्योगांना पाठबळ, दुसऱ्या व तिसऱ्या फळीतील शहरांना निधी देण्याबरोबरच तेथील उद्योजकांना तांत्रिक सल्लासेवा, बाजारपेठेची माहिती, व्यावसायिक मार्गदर्शन यासाठी 'कॉर्पोरेट मित्र' नेमणे या सर्व प्रस्तावांचा हेतू विकासाचा मार्ग प्रशस्त करणे, आर्थिक वाढीचे उद्दिष्ट साध्य करणे हा आहे. या अर्थसंकल्पात तत्काळ फायदा काय, असा प्रश्न विचारणे संयुक्तिक होणार नाही. प्राप्तिकरातील सवलती यापूर्वीच देऊन झाल्या असून, वस्तू व सेवा करांच्या दरातही अलीकडेच घट करण्यात आली होती. त्यामुळेच सवलतींच्या अपेक्षेने या अर्थसंकल्पाकडे डोळे लावून बसलेल्यांची निराशा होईल. यावेळच्या अर्थसंकल्पी भाषणाला सत्ताधारी सदस्य वारंवार बाके वाजवून दाद देत होते; तरी समाजातून फारशा 'टाळ्या' मिळण्याची शक्यता नाही. परंतु लोकप्रिय घोषणांचा मोह टाळून आणि वित्तीय तूट आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न करून अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वास्तवाचे भान ठेवले आणि देशाच्या आंतरिक सामर्थ्यावर भरवसा दाखवला ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

## टी-२० वर्ल्डकप २०२६

# आफ्रिकेने विंडिजविरुद्धची मॅच जिंकली

## पण सेमी फायनलसाठी भारतावर अवलंबून राहणार; असे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांच्यात अहमदाबाद येथे सुपर आठमधील सामना रंगला जो आफ्रिकेने सहज जिंकला. आफ्रिकेने सामना जिंकल्यामुळे जसा भारताला सेमी फायनलसाठी फायदा झाला तसा भारत जर झिम्बाबेविरुद्धचा सामना भारताने जिंकला तर आफ्रिकेलाही फायदा होईल.

अहमदाबादमध्ये दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजचा नऊ विकेटने मोठ्या फरकाने पराभव केला. कर्णधार एडेन मार्करामच्या स्फोटक खेळीने दक्षिण आफ्रिकेच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. क्विंटन डी कॉक आणि रायन रिकेल्टन यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. वेस्ट इंडिजला पराभूत केल्याने उपांत्य फेरीत पोहोचण्याची आफ्रिकेची महत्त्वाकांक्षाच वाढली नाही तर भारतीय संघालाही फायदा झाला.



दक्षिण आफ्रिकेच्या विजयामुळे आता भारतीय संघ सेमी फायनल पोहोचण्याची शक्यता वाढली आहे.वेस्ट इंडिजने दक्षिण आफ्रिकेसाठी १७७ धावांचे लक्ष्य ठेवले होते आणि दक्षिण आफ्रिकेने २३ चेंडू शिल्लक असताना लक्ष्याचा पाठलाग केला. दक्षिण आफ्रिकेने १६.१ षटकांत सामना जिंकला आणि उपांत्य फेरीतील स्थानासाठीचा त्यांचा दावा आणखी मजबूत केला. दरम्यान, नऊ विकेटने झालेल्या पराभवानंतर वेस्ट इंडिजचा धावगती दर देखील ५.३५ वरून १.७९१ वर घसरला.१७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, दक्षिण आफ्रिकेने क्विंटन डी कॉक आणि एडेन मार्कराम यांच्यासह शानदार सुरुवात केली. त्यांनी फक्त आठ षटकांत ९५ धावा जोडल्या आणि वेस्ट इंडिजच्या गोलंदाजीचा धुव्वा उडवला.

डी कॉकने २४ चेंडूत ४७ धावा केल्या, तर कर्णधार मार्करामने ७ चौकार आणि ४ षटकारांसह ८२ धावा केल्या. रायन रिकल्टन ४५ धावांवर नाबाद राहिला. जर भारताने आज संध्याकाळी झिम्बाब्वेला हरवले तर दक्षिण आफ्रिका उपांत्य फेरीत पोहोचेल. एडेन मार्करामच्या वादळी गोलंदाजीपूर्वी, लुंगी एनगिडीने तीन बळी घेत कॅरेबियन फलंदाजीचा नाश केला. कागिसो रबाडा आणि कॉर्बिन बॉश यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

वेस्ट इंडिजवर नऊ विकेट्सने विजय मिळवून, दक्षिण आफ्रिका आता सुपर ८ च्या ग्रुप ए मध्ये पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थानावर आहे. यामुळे भारताचा सेमीफायनलमध्ये प्रवेश करण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. भारताचे भवितव्य आता त्यांच्या हातात आहे. सेमीफायनलमध्ये पोहोचण्यासाठी, भारताला झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजविरुद्धचे पुढील दोन सामने जिंकावे लागतील. भारताने आज झिम्बाब्वेविरुद्धची मॅच जिंकली तर आफ्रिका सेमी फायनलसाठी क्वालिफाय होईल. ▲

# सोने-चांदीच्या दरात घसरण; ग्राहकांमध्ये काहीसे समाधान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून सतत वाढत असलेले सोने-चांदीचे दर आज अखेर काहीसे कमी झाले आहेत. ही सर्वसामान्यांसाठी समाधानाची बाब म्हणावी लागेल. गेल्या वर्षीपासून सोने आणि चांदीचे दर हे सतत वाढताना दिसत आहेत. आता हे दर आकाशाला स्पर्श करत असताना आजचा दिवस हा ग्राहकांसाठी चांगला आहे. कारण सतत सात दिवसांनंतर आज सोने-चांदीचे दर कमी झाले आहेत.



जळगावच्या सराफ बाजारात आज बाजार उघडताच सोने-चांदीच्या दरात घसरण झाली. सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम ८०० तर चांदीच्या दरात प्रतिकिलो ५ हजार रुपयांची घसरण झाली. त्यामुळे २४ कॅरेट सोन्याचे दर १० ग्रॅमसाठी जीएसटीसह एक लाख ६३ हजार ७७० रुपयांवर आले आहेत. तर चांदीचे दर दोन लाख ७८ हजार १०० रुपयांवर पोहोचले आहेत. ▲

# नारळाच्या काथ्यामध्ये उगवेल झाड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मनी प्लांटला मातीत किंवा पाण्यात लावल्यानंतर थोडासा वेगळा प्रयोग करायचा विचार करत असाल, तर बागकाम तज्ज्ञांची कल्पना पाहा. त्यांनी रोपाला नवीन अंदाज देण्यासाठी नारळाच्या काथ्याचा उपयोग केला. ज्यूट दोरी आणि काचेच्या भांड्यांचा वापर करून असा सेटअप सहज तयार करता येईल.



सर्वांनाच घरात रोपे ठेवायला आवडतात आणि मनी प्लांटसाठी लोक माती आणि पाणी दोन्ही माध्यम वापरतात. मनी प्लांट नारळाच्या कवचातही वाढवता येईल का? यावर बागकामतज्ज्ञांनी एक वेगळी आणि क्रिएटिव्ह पद्धत सुचवली आहे. ही पद्धत फक्त रोपाची वाढ सुधारत नाही, तर घराच्या आतील वातावरणाला नैसर्गिक आणि मनमोहक रूप देते. त्यामुळे, जर तुम्हाला तुमच्या मनी प्लांटसह काहीतरी वेगळे करायचे असेल, तर तंतुमय नारळाच्या कवचात रोप लावून एक खास आणि आकर्षक सेटअप तयार करू शकता एक सुके नारळ घ्या आणि त्यातील तंतुमय साल काळजीपूर्वक काढून टाका. त्यांच्या मते, हातांनी थोडीशी ओढून ती साल सैल करा. साल सैल करणे महत्वाचे आहे जेणेकरून जेव्हा तुम्ही मनी प्लांटचे कटिंग्ज त्यात ठेवता तेव्हा त्यांना वाकवणे आणि आकार देणे सोपे होईल आणि तंतू तुटणार नाहीत.

**मनी प्लांटच्या कटिंग्जची निवड**

या अनोख्या पद्धतीसाठी, तुम्हाला मनी प्लांटचे लहान, निरोगी कलमे घ्यावी लागतील. प्रत्येक कलमात किमान एक गाठ आहे, जी मुळावण्याचा बिंदू आहे याची खात्री करा. लहान कलमे नारळाच्या सालामध्ये व्यवस्थित बसतात आणि लवकर मुळे होतात. आता सोडलेल्या नारळाच्या सालांना सपाट पसरवा. मनी प्लांट कटिंग थेट सालांच्या मध्यभागी ठेवा. कटिंगचा तळाचा भाग सालच्या तंतूंनी चांगला झाकलेला आहे याची खात्री करा. हे तंतू ओलावा शोषून घेतील आणि मुळांना वाढण्यास मदत करतील. एकदा तुम्ही कटिंग मध्यभागी ठेवल्यानंतर, साले काळजीपूर्वक कडाभोवती घडी करा. आता, ज्यूट दोरीचा तुकडा घ्या आणि सालांचा बंडल सुरक्षितपणे बांधा. ज्यूट दोरी वापरल्याने ते खूप ग्रामीण आणि नैसर्गिक दिसते आणि ते पाण्याला प्रतिरोधक देखील आहे.

आता नारळाच्या या गठ्ठ्याला सजवण्याची वेळ आली आहे. एक पारदर्शक काचेचे भांडे घ्या तसेच बरणीच्या तळाशी पांढरे किंवा रंगीत दगड ठेवा. हे दगड बरणीला केवळ स्थिरता देणार नाहीत तर काचेतून सुंदर दिसतील. पुढे, तयार केलेला नारळाचा गठ्ठा बरणीच्या मध्यभागी ठेवा. नारळाच्या सालाचा तळ बुडेल एवढे पाणी बरणीमध्ये भरा. नारळाचे तंतू स्पंजसारखे काम करतात आणि पाणी शोषून घेतात, ज्यामुळे मनी प्लांट सतत हायड्रेटेड राहतो. अशा प्रकारे लावलेला मनी प्लांट तुमच्या लिव्हिंग रूम किंवा ऑफिस डेस्कला एक अनोखा आणि आधुनिक लूक देईल. ▲

# बहिर्जी नाईक एक अज्ञात थोरपण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दहा- दहा दिवस अन्नपाण्याशिवाय राहतो, तर महिना महिना भर एकाच झाडावर दबा धरुन बसतो. धावायला लागला तर वाऱ्याच्या कानफाटीत मारल्यासारखे धावतो, पुराच्या डोहात खुशाल उडी मारतो, तलवार, भाला, फरीगगदा, पट्टा, विटटा, धनुष्य असे काही चालवतो की समोर महासागर येऊदे शत्रूचा शत्रूच्या राणीवशात जाऊन राहू शकतो, तर खुद्द औरंगजेबाच्या दरबारात जाऊन त्यालाच कव्वाली ऐकवून बक्षीस घेऊन येऊ शकतो. माणूस म्हणाल तर एकही माणसाचा गुण नाही, जनावर म्हणाल तर दिसतो माणसासारखा. मोठमोठ्या गोष्टीत अचूक निर्णय, सावध नियोजन आणि स्वतःच्या देखरेखीखाली प्रत्यक्ष घोडदौड. खरे सांगतो गड्यांनोहा बहिर्जी नाईक जणू शिवरायांचा तिसरा डोळाच होता.



शिवराय त्याला इतके मानत की महाराजांच्या राणीवशात एकमेव जिजाऊ माँसाहेब सोडून कोणी विना परवाना जाऊ शकत असतील ते म्हणजे बहिर्जी नाईक. गड्यांनो,महाराजांचा नाईकांच्यावर इतका विश्वास की हा माणूस चुकून सुद्धा चूक करु शकणार नाही इतका दृढ विश्वास. पाची पातशाहिना रणांगणात चारी मुंडी चित करुन जेव्हा महाराज राज्याभिषिक्त झाले तेव्हा सुद्धा बहिर्जी नाईक समोर येऊ शकत नव्हते इतकी गुप्तता पाळत होते नाईक.

महाराजांचा अभिषेक सुरु होता, महाराज मुक्त हस्ताने गरीब फकिराना ओंजळ भरभरून द्रव्य दान करत होते आणि एक म्हातारा फकीर त्या रांगेत उभा होता. जक्ख म्हातारा हुंदके देऊन रडत होता आणि डोळे भरून महाराजांना पाहत होता. महाराजांनी जेव्हा त्या फकिराला पाहिले तेव्हा मात्र त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला. ओठावर मिशा नव्हत्या तेव्हा पासून या बहिर्जीने आणि मी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि आज मराठेशाही स्थापन होत आहे. राज्य आनंदात आहे आणि ज्याने आजवर सारी संकटे आपल्या छातीवर झेलली तो बहिर्जी फकीर होऊन याचकांच्या रांगेत उभा आहे. काय बोलावे या प्रकाराला. कसली वेडी माणसे असतील ती, एका मंदिराला फरशी दान दिली की साऱ्या घराण्याची नावे टाकणारे तुम्ही आम्ही त्या बहिर्जी नाईकांच्या काळजाला कधी समजू शकू का ? स्वतःच्या बायकोला सुद्धा अगदी शेवटपर्यंत माहिती नव्हते की ज्याच्या सोबत मी सात जन्माचे बंधन बांधले आहे तो खुद्द स्वराज्याचा गुप्तहेरप्रमुख बहिर्जी नाईक आहे. इतकी कमालीची गुप्तता. एवढा विलक्षण त्याग करुन राजे त्यांना देत तर काय होते हो ? काहीच नाही. उलट प्रत्येक मोहिमेत जीवाचा प्रश्नमाघारी येईल का नाही शाश्वती नव्हती! ही वेडी खुळी माणसे अशी का जगली असतील ? बस्सएवढ्या एका प्रश्नाचे उत्तर ज्याला समजून येईल त्याच्या आयुष्याचे सोनं झाल्याशिवाय राहणार नाही.! अश्या या स्वराज्य वेड्या माणसांना मानाचा मुजरा ! जय जिजाऊ जय शिवराय....


नरवीर बहिर्जी नाईक जाधव समाधी - बानुर गड ▲

# दुसऱ्या महायुद्धानंतर अणुबॉम्बविरोधी प्रचार करणारे ज्युलियस रॉबर्ट ओपेनहायमर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्युलियस रॉबर्ट ओपेनहायमर हे अणु बॉम्बच्या जनकांपैकी एक पण दुसऱ्या महायुध्दानंतर ओपेनहायमर यांनी उरलेले आयुष्य अणु बॉम्बच्या विरुद्ध प्रचार करण्यात घालवले. काय आहे हा विरोधाभास ? ओपेनहायमर यांना अणु बॉम्बच्या जनकांपैकी एक मानले जाते. याच ओपेनहायमर यांनी आपले अर्धे आयुष्य अणुबॉम्बचा विरोध करण्यात घालवले हा मोठाच विरोधाभास आहे. ज्युलियस रॉबर्ट ओपेनहायमर बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी स्मृतीदिन होता. यानिमित्त जाणून घेऊयात त्यांचे कार्य.

९ ऑक्टोबर १९४१ मध्ये तत्कालिन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रॅन्कलीन रूझवेल्ट यांनी अणुबॉम्ब तयार करण्याच्या प्रक्रियेला हिरवा कंदील दाखवला. अमेरिकेच्या राष्ट्रीय संरक्षण संशोधन समितीचे मुख्य जेम्स बी. कोनंट हे त्यावेळी हार्वर्ड येथे प्राध्यापक होते. त्यांनीच अणुबॉम्ब तयार करण्याच्या या मोहिमेत ओपेनहायमर यांना सामील करून घेतले. या मोहिमेत सामील झाल्यानंतर ओपेनहायमर यांनी जीव तोडून मेहनत केली. त्यांच्यावर सर्वात मोठी जबाबदारी होती ती अणुस्फोटात सुरु होणाऱ्या प्रक्रियेचा अभ्यास करणे. याखेरीज त्यांनी स्वतःच्या विद्यार्थ्यांना तसेच युरोपियन शास्त्रज्ञांना हाताशी घेऊन अणुबॉम्बसाठीची थियरी तयार करण्यासाठी खास वर्ग आयोजित केले. या टीमला बॉम्ब तयार करण्यासाठी लागणाऱ्या संपूर्ण प्रक्रियेचाच अभ्यास करायचा होता.



१९४२ साली अमेरिकन सैन्याने अणुबॉम्ब तयार करण्याच्या मोहिमेत सहभाग घेतला आणि त्याला नाव दिले मॅनहॅटन प्रकल्प. लेस्ली ग्रोव्हज या प्रकल्पाचे मुख्य होते. ग्रोव्हज यांना ओपेनहायमर यांचे काम आवडले होते. त्यामुळे पुढे जाऊन ग्रोव्हज यांनी ओपेनहायमर यांना शस्त्र प्रयोगशाळेचे मुख्य म्हणून घोषित केले. या घोषणेने अनेकांना धक्का बसला. कारण ओपेनहायमर हे डाव्या विचारांचे होते, शिवाय त्यांना मोठे प्रकल्प हाताळण्याचा अनुभवही नव्हता. मात्र, ग्रोव्हज यांना त्यांच्यावर एवढा विश्वास होता, की इतरांच्या विरोधाला न ऐकता ओपेनहायमर यांनाच प्रमुखपद देण्यात आले. १६ जुलै १९४५ याच दिवशी अणुबॉम्बची यशस्वी चाचणी करण्यात आली होती. ओपेनहायमर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्या प्रकल्पासाठी दिवसरात्र मेहनत केली होती ते आता प्रत्यक्षात उतरले होते. अणुबॉम्बचा स्फोट झाल्यांनतर ४ लाख फुट उंच ढग तयार झाला. या स्फोटाला पाहून ओपेनहायमर यांच्या मनात आनंद नव्हता. या ठिकाणी त्यांचे जगप्रसिद्ध वाक्य आपल्या प्रत्येकाने वाचायला हवे. ते म्हणतात, "मला हिंदू धर्मग्रंथ भगवद्गीतेतील ओळ आठवली. आता मी जगाचा विनाश करणारा साक्षात मृत्यू बनलो आहे. आणि मला वाटते की तिथे प्रत्येकाला हेच वाटत असावे."

त्यांच्या मनात आलेला हा विचार किती योग्य होता हे पुढे एक महिन्याच्या आतच सगळ्या जगाला समजले. अनुक्रमे ६ आणि ९ ऑगस्ट रोजी हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबॉम्ब टाकण्यात आला. दुसऱ्या हल्ल्यानंतर जपानने शरणागती पत्करली आणि दुसरे महायुद्ध संपले. या दोन घटना जेव्हा मॅनहॅटन प्रकल्पात सामील असलेल्या शास्त्रज्ञांच्या कानावर पडल्या तेव्हा त्यांनाही हादरा बसला. ओपेनहायमर वर्षाच्या अखेरीस तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांच्याकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर अण्वस्त्र निर्मितीवर नियंत्रण आणाण्याची मागणी घेऊन पोचले. मात्र, ट्रुमन यांना भलत्याच गोष्टीची चिंता भासत होती. तोवर शीतयुद्धाला सुरुवात होऊ लागली असल्याने रशियाने अण्वस्त्रे तयार केली तर काय, हा मोठा प्रश्न ट्रुमन यांच्यासमोर होता. त्यामुळे ओपेनहायमर यांच्या मागणीला ताबडतोब धुडकावून लावण्यात आले. ट्रुमन ओपेनहायमर यांच्यावर जवळजवळ खेकसले होते.

असे म्हणतात, की ओपेनहायमर यांना जपानमध्ये जे घडले त्यापेक्षा भविष्यात येऊ घातलेल्या विनाशाची जास्त काळजी होती. ओपेनहायमर यांच्या आयुष्यातील पुढील वर्षे अण्वस्त्रांवर रोख आणण्यासाठी झगडणे यातच खर्ची पडली. महायुद्धानंतर ओपेनहायमर यूएस ॲटोमिक एनर्जी संस्थेत काम करत होते. ट्रुमन यांनी १९४९ मध्ये या संस्थेला हायड्रोजन बॉम्ब तयार करण्याचे आदेश दिले. ओपेनहायमर यांनी याला विरोध केला. मात्र, त्यांच्या विरोधाला न जुमानता अमेरिकेने हायड्रोजन बॉम्ब तयार केला. याच काळात त्यांच्यावर साम्यवादी असण्याचे आरोप करण्यात आले. हायड्रोजन बॉम्बला केलेला विरोध आणि साम्यवादी असण्याच्या संशयावरून त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले. काही अभ्यासकांच्या मते त्यांना नोकरीवरून काढण्यामागे त्यांचा हायड्रोजन बॉम्बला असलेला विरोध जास्त कारणीभूत होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका रशिया यांच्यात सुरु झालेल्या स्पर्धेत कोणाकडे किती शक्ती आहे याचे प्रदर्शनच सुरु झाले. या धामधुमीत ओपेनहायमर यांचा शांततेचा संदेश राज्यकर्त्यांच्या पाचनी पडला नाही आणि कोणाला ऐकूही गेला नाही. कामावरून काढून टाकल्यानंतरही ते प्राध्यापक म्हणून काम करत राहिले. त्यांनी लेखनही केले. या घटनेपासून सुरु झालेला साम्यवादी असण्याचा शिक्का त्यांना आयुष्यभर पुरला. १८ फेब्रुवारी १९६७ ला त्यांनी या जगाचा निरोप घेतला. ते या जगातून गेल्यानंतरही त्यांच्यावर रशियन गुप्तहेर असल्याचा संशय घेतला जात होता. अमेरिकेच्या या महत्त्वाच्या संशोधकाला ज्याप्रकारे वागणूक मिळाली त्याची भरपाई म्हणून ९ वर्षांनी राष्ट्रध्यक्ष जॉन एफ केनेडी यांनी त्यांचा मरणोत्तर एनरिको फर्मी पुरस्कार देऊन गौरव केला.

ओपेनहायमर यांना अणु बॉम्बच्या जनकांपैकी एक मानले जाते. याच ओपेनहायमर यांनी आपले अर्धे आयुष्य अणुबॉम्बचा विरोध करण्यात घालवले हा मोठाच विरोधाभास आहे. ▲

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# मसाला पान



## मराठी भाषा गौरव दिन विशेष

# अस्मितेचा उत्सव

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस महाराष्ट्रात मराठी भाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस मराठीतील थोर कवी व साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्याची परंपरा आहे. मराठी भाषेच्या जतन, संवर्धन आणि अभिमानाची जाणीव करून देणारा हा दिवस प्रत्येक मराठी माणसासाठी प्रेरणादायी ठरतो.

### मराठी भाषेची परंपरा आणि समृद्ध वारसा


मराठी भाषा ही सुमारे हजार वर्षांची परंपरा लाभलेली, समृद्ध आणि अभिजात भाषा आहे. संत साहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत मराठीने विविध टप्पे अनुभवले आहेत. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या अभंगांनी मराठीला आध्यात्मिक अधिष्ठान दिले; तर पुढे लोकमान्य टिळक, आगरकर, गोपाळ गणेश आगरकर यांच्या लेखनाने सामाजिक व राजकीय जाणीवा जागृत केल्या. मराठी भाषेने कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र, विज्ञानलेखन



अशा अनेक साहित्य प्रकारांमध्ये उल्लेखनीय भर घातली आहे. मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीनेही भाषेच्या प्रसारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### कुसुमाग्रजांचे योगदान

मराठी भाषा गौरव दिन हा वि. वा. शिरवाडकर यांच्या



स्मृतिप्रीत्यर्थ साजरा केला जातो. कुसुमाग्रज हे केवळ कवी नव्हते, तर ते नाटककार, कथाकार आणि विचारवंतही होते. त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाने स्वातंत्र्यलढ्याच्या काळात युवकांमध्ये देशप्रेमाची जाज्वल्य भावना निर्माण केली. त्यांचे साहित्य सामाजिक समता, स्वातंत्र्य, मानवी हक्क आणि राष्ट्रीय अभिमान या मूल्यांना अधोरेखित करणारे आहे. त्यांच्या कार्यामुळे मराठी साहित्याला राष्ट्रीय पातळीवर विशेष ओळख मिळाली.

### जागतिकीकरणाच्या युगातील मराठी

आजच्या डिजिटल आणि जागतिकीकरणाच्या काळात इंग्रजीसह इतर भाषांचा प्रभाव वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. सोशल मीडियावर, शिक्षणात, व्यवसायात आणि प्रशासनात मराठीचा वापर वाढवणे आवश्यक आहे. नव्या पिढीने मराठी वाचनाची आवड जोपासावी, मराठी पुस्तके वाचावीत, मराठी लेखनाला प्रोत्साहन द्यावे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करणे शक्य आहे. मराठी ब्लॉग्स, संकेतस्थळे, ई-पुस्तके, ऑडिओबुक्स यांमुळे भाषा अधिक व्यापक होत आहे.

### भाषा गौरव दिनाचे महत्त्व

मराठी भाषा गौरव दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून, तो आपल्या सांस्कृतिक ओळखीचा उत्सव आहे. शाळा, महाविद्यालये आणि विविध संस्थांमध्ये भाषण स्पर्धा, निबंधलेखन, काव्यवाचन, चर्चासत्रे यांचे आयोजन केले जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये भाषेप्रती प्रेम आणि अभिमान निर्माण होतो. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची वाहक असते. मराठी भाषा ही आपल्या परंपरेची, इतिहासाची आणि संस्कृतीची साक्षीदार आहे. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्वांनी मराठीचा अभिमान बाळगून तिच्या जतनासाठी कटिबद्ध राहण्याची प्रतिज्ञा करावी.

**'जपूया मराठी, वाढवूया मराठी आणि अभिमानाने बोलूया मराठी!'**

**मराठी भाषा गौरव दिनाच्या सर्वांना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!**

# सुशिक्षित तरुणाची कमाल

## सेंद्रिय शेतीतून करतोय वर्षाला ७० लाखांची कमाई

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सध्याच्या घडीला राज्यासह देशभरात अनेक सुशिक्षित तरुण शेती तसेच शेती आधारित उद्योगांमध्ये आपले नशीब आजमावत आहे. विशेष म्हणजे या तरुणांना आपल्या ज्ञान आणि शिक्षणाच्या जोरावर यात मोठे यश देखील मिळत आहे. आपण अशाच एका तरुण शेतकरी उद्योजकाची यशोगाथा पाहणार आहोत. ज्याने सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून आपली प्रगती साधली आहे. त्याने सेंद्रिय शेतीआधारीत कंपनी स्थापन केली असून, तो त्या माध्यमातून वार्षिक ७० लाख रुपये इतकी कमाई करत आहे.

### सेंद्रिय शेतीला प्रोत्साहनासाठी पुढाकार

भावेश पुरोहित असे या शेतकरी उद्योजकाचे नाव असून, तो गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील रहिवासी आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर भावेश याने शेतीमध्ये काहीतरी नवीन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्याने शेतीमध्ये सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी अनोखा पुढाकार घेतला. त्याने २०१७ मध्ये 'धेनू प्रसाद' नावाची कंपनी सुरू केली. ही कंपनी गोमूत्रापासून नैसर्गिक खते बनवते. आज ही कंपनी वार्षिक ७० लाख रुपये इतका टर्नओव्हर करत आहे.



### कशी सुचली कल्पना

सुरूवातीला भावेश याने बनासकांठा जिल्ह्यातील भाभर येथे 'धेनू प्रसाद' नावाने रासायनिक कीटकनाशकांऐवजी गोमूत्रापासून बनवलेल्या नैसर्गिक खते व किटकनाशकांचा प्रचार सुरु केला. भावेश पुरोहित यांनी २०१७ मध्ये ही कंपनी सुरू केली. तो याच जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्याने बायोटेक्नॉलॉजीमध्ये पदवी घेतली आहे. तो निराधार गायींना सांभाळत हा व्यवसाय करत आहे. निराधार गायी सांभाळत शेतकऱ्यांना त्यांचा फायदा व्हावा, अशी त्यांची इच्छा होती. त्यातून त्याच्या गोमूत्राचे १०० टक्के नैसर्गिक खतामध्ये रूपांतर करण्याची कल्पना धेनू प्रसादच्या माध्यमातून त्याच्या मनात आली.

### जागरूकतेसाठी शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा

जवळपास तीन वर्षे संशोधन केल्यानंतर भावेशने आपले स्टार्टअप गोमूत्र खत उद्योग यशस्वीपणे सुरू केला. भावेश पुरोहित याने तयार केलेले सेंद्रिय खते ही दररोज आजूबाजूच्या गावात आणि शेतात जात असत. मात्र त्यांना फारशी मागणी मिळत नसे. ज्यामुळे त्याने गोमूत्र खताच्या फायद्यांविषयी जागरूक करण्यासाठी शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या. ज्यामुळे शेतकऱ्यांना गोमूत्र खताबाबत माहिती मिळण्यास मदत झाली.

### दरमहा ४५,००० लिटर गोमूत्रावर प्रक्रिया

भावेशच्या याच प्रयत्नातून आज 'धेनू प्रसाद' ही गोमूत्र डेअरी म्हणून उद्याला आली आहे. त्यांच्या कंपनीच्या माध्यामातून ५०० हून अधिक शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्यास मदत होत आहे. कंपनी दरमहा ४५,००० लिटर गोमूत्रावर प्रक्रिया करते. ही खते नैसर्गिक कीटकनाशक आणि खते म्हणून उपलब्ध आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात कंपनीचा महसूल ७० लाख रुपये इतका होता. सध्या कंपनी आपल्या कार्याचा विस्तार करण्याचा विचार करत आहे. आगामी काळात दररोज १०,००० लिटर्सवर प्रक्रिया करून उत्पादनांचा विस्तार करण्याचे कंपनीचे लक्ष्य आहे.


# नीम करोली बाबा जी के परम भक्त एवं ड्राईवर हबीब खान की कहानी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

नीम करोली बाबा जी के परम भक्त और ड्राईवर हबीब खान जी जो महाराज जी के साथ में काफी समय तक रहे और अनगिनत साक्षात करिश्में देखे सयोंग से अब ये टोक्यो जापान में रह रहे हैं।

हम सब इनको नमन करते हैं नीम करोली बाबा जी के परम भक्त एवं ड्राईवर हबीब खान की कहानी

गाड़ी में पेट्रोल नहीं है तो टंकी में पानी डाल दो- कैंची धाम में उस रात बाबा नीमकरोरी की गाड़ी में पेट्रोल कम था चालक ने पेट्रोल भरवा लाने को कहा तो बाबाजी ने मना कर दिया। कुछ देर बाद अचानक बोल पड़े कि हबीबुल्ला गाड़ी निकालो अल्मोड़ा चलना है हाड़ कंपाती ठंड में चालक हबीबुल्ला बाबाजी को लेकर दुखी मन से अल्मोड़ा की ओर चल पड़ा। वह मन ही मन सोच रहा था कि अब वह बाबाजी की नौकरी छोड़ देगा। तभी ५ किलोमीटर



चलने के बाद रानीघाट के ढ़ाल के पास पहुंचकर गाड़ी खड़ी हो गयी अब चालक जंगल में रात बिताने की बात सोचकर घबराने लगा। तभी बाबाजी ने पास ही स्थित जलश्रोत से तीन कैन पानी भरकर टंकी में डालने को कहा चालक ने यह सोचते हुये कि सुबह तो उसे नौकरी छोड़कर जाना ही है खीजते हुये पानी टंकी में डाल दिया तथा कंबल लेकर दूर जाकर बैठ गया। वह सोचने लगा कि अब तो यह निश्चित है कि रात भर जंगल में ठिठुरना पड़ेगा तभी बाबाजी ने कड़क आबाज में उसे आदेश दिया कि कंबल गाड़ी में रख तथा तेज गति से अल्मोड़ा के लिये चल। देर बहुत हो गयी है... और यह क्या गाड़ी तत्काल स्टार्ट हो गयी... बाबाजी पूरी रात न जाने कहां कहां घूमकर सुबह कैंची धाम वापस आ गये चालक हबीबुल्ला ने भी नौकरी छोड़कर जाने का इरादा पूरी तरह त्याग दिया।

# मन:शांती हवी आहे?

## १० मिनिटांचे मौन तुमचे आयुष्य बदलू शकते

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कधी-कधी आपण शब्दांतून स्वतःला जितके अचूक व्यक्त करू शकत नाही, त्यापेक्षा जास्त आपण शांत राहून व्यक्त करतो. काही लोक केवळ 'न बोलणे' म्हणजे मौन मानतात, पण तसे अजिबात नाही. मौन म्हणजे केवळ शब्दांचा अभाव नव्हे, तर ती आंतरिक शांती आहे.

२०१३ मध्ये ब्रेन स्ट्रक्चर अँण्ड फक्शन जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार दोन तासांचे मौन मेंदूतील हिप्पोकॅम्पस (स्मरणशक्ती व भावनांशी संबंधित भाग) मध्ये नवीन पेशींची वाढ वाढवू शकते. संशोधनानुसार काही वेळ मौन पाळल्याने मेंदू अधिक स्पष्टपणे विचार करतो. तणाव कमी होऊन निर्णयक्षमता सुधारते. मौन पाळल्याने कॉर्टिसोल (तणाव हार्मोन) कमी होण्यास मदत होते. अमेरिकन सायकॉलॉजिकल असोसिएशनच्या अहवालानुसार नियमित ध्यान व शांत बसण्याची सवय तणाव नियंत्रणासाठी प्रभावी ठरते.

२००६ मधील अमेरिकन हर्ट असोसिएशनच्या संशोधनात आढळले, की दररोज काही मिनिटे शांत बसल्याने रक्तदाबात घट होते. मौनामुळे मेंदूतील अम्यग्लदाला (भीती आणि राग नियंत्रित करणारा भाग) कमी सक्रिय होतो, ज्यामुळे राग आणि चिंता कमी होतात. गोंगाटापेक्षा शांततेत मेंदू अधिक स्पष्टपणे विचार करू शकतो. काही मिनिटे मौन राहण्याचा सराव केल्यास महत्त्वाचे निर्णय घेणे सोपे जाते. प्रत्येक वेळी उत्तर देणे आवश्यक नसते. काही प्रसंगी मौन बागळल्यास मनशांती लाभते.

# बाटलीच्या झाकणाचा रंग आणि अर्थ काय?



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दुकानातून पाणी विकत घेताना तुम्ही वेगवेगळ्या ब्रँडच्या पाण्याची बाटली पाहिली असेल. ज्याच्या झाकणांचा रंग हा निळा, हिरवा, पिवळा, काळा असल्याचे तुम्ही पाहिले असेल. अनेकांना वाटते की हा ब्रँडच्या रंगामुळे त्याच्या बाटलीचा आणि त्याचा झाकणाचा रंग वेगवेगळा असतो. पण असे नाही, हा तुमचा चुकीचा समज आहे. खरेतर पाण्याच्या बाटलीवरील झाकणाचा रंग काहीतरी महत्त्वाची सूचना देत असतो. ज्याकडे आपण दुर्लक्ष करतो. चला बाटलीच्या झाकणाचा रंग आणि त्याचा अर्थ काय? जाणून घेऊ.

### १) पांढरे झाकण : मशीन फिल्टर्ड वॉटर

पांढऱ्या रंगाच्या झाकणाची बाटली म्हणजे हे पाणी मशीनद्वारे किंवा आरओ प्लांटमधून फिल्टर करून भरलेले आहे. हे पाणीही प्यायला योग्य असते, मात्र मिनरल्सची मात्रा थोडी कमी असते.

### २) हिरवे झाकण : फ्लेवर्ड वॉटर

हिरव्या रंगाच्या झाकणाच्या बाटल्यांमध्ये फ्लेवर्स मिसळलेले असतात. चव बदलण्यासाठी हे पाणी वापरले जाते. मिनरल वॉटरइतके हे शुद्ध नाही, पण हे पाणी सुरक्षित असते.

### ३) निळे झाकण : मिनरल वॉटर

जर तुम्ही निळ्या रंगाच्या झाकणाची बाटली घेतली असेल, तर त्याचा अर्थ असा की हे पाणी नैसर्गिक झऱ्यातून किंवा मिनरल सोअर्समधून आणलेले आहे. हे पाणी आरोग्यासाठी सर्वांत जास्त चांगले मानले जाते.

### ४) काळे झाकण : अल्कलाइन वॉटर

काळ्या झाकणाच्या बाटल्यांमध्ये अल्कलाइन वॉटर असते. ज्यामध्ये भरपूर मिनरल्स असतात. हे पाणी महाग असते आणि जगभरातील खेळाडू आणि सेलिब्रिटी हेच पाणी पिणे पसंत करतात.

### ५) पिवळे झाकण : व्हिटॅमिन्स वॉटर

पिवळ्या रंगाच्या झाकणाची बाटली म्हणजे व्हिटॅमिन्स आणि इलेक्ट्रोलाइट्सनी समृद्ध असलेले पाणी. हे पाणी शरीराला ऊर्जा देण्यासाठी आणि हेल्दी राहण्यासाठी उपयुक्त आहे.


# लालबहादूर शास्त्रींनी मागितली मीनाकुमारींची माफी!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मीनाकुमारी यांनी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या गळ्यात हार घालून त्यांचे स्वागत केले. पण शास्त्रीजींनी हळूच एक प्रश्न विचारला, की 'या बाई कोण आहेत.'

हा किस्सा आहे कुलदीप नय्यर यांच्या 'On Leaders and Icons: From Jinnah to Modi' या पुस्तकातला.

पाकीजा चित्रपटाचे शूटींग सुरू होते तेव्हाची ही गोष्ट आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि इतर राजकारणी पुढाऱ्यांनी पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींना पाकीजाचे शूटींग बघायचा आग्रह केला. या प्रसंगाचे वर्णन करताना कुलदीप नय्यर म्हणतात, की 'त्यावेळी स्टुडिओत अनेक मोठे फिल्मी सितारे उपस्थित होते.



जसे मीना कुमारींनी लालबहादूर शास्त्रींना हार घातला तसे शास्त्रीजींनी फार नम्रपणे मला विचारले, की 'या बाई कोण आहेत?' मी आश्चर्यचकित झालो आणि त्यांना सांगितले, की त्या मीना कुमारी आहेत. त्यावर शास्त्रीजींनी पुन्हा आपले अज्ञान व्यक्त केले. मग मी शास्त्रीजींना त्यांच्या काही चित्रपटांची नावे सांगितली आणि त्या-त्या चित्रपटांच्या नायिका आहेत, असेही सांगितले. शास्त्रीजी म्हणाले, की 'सॉरी कुलदीप, मी आजपर्यंत कधीच चित्रपट पाहिलेला नाही.'

पुढे कुलदीप नय्यर यांनी लिहिले , की 'शास्त्रीजींचे हे निरागसपण आणि प्रामाणिकपण मला फार भावले.' नंतर लालबहादूर शास्त्री यांनी भाषणात मीना कुमारींना उद्देशून म्हटले "मीना कुमारीजी, कृपया मला माफ करा. मी तुमचे नाव पहिल्यांदाच ऐकले आहे." देशाच्या पंतप्रधानांनी एका अभिनेत्रीची अशी सार्वजनिकपणे माफी मागितली, ही गोष्ट लोकांना खूप आवडली. पण त्याच वेळी लाखो हृदये जिंकणाऱ्या मीना कुमारींच्या चेहऱ्यावर संकोचाची छटा दिसून येत होती.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे

मंगल पान

# श्रद्धा, निसर्ग आणि अध्यात्म यांचा अद्वितीय संगम : मुकांबिका मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कर्नाटकातील उडुपी जिल्ह्यातील कोल्लूर या निसर्गरम्य गावात वसलेले मुकांबिका मंदिर हे दक्षिण भारतातील एक अत्यंत पूजनीय शक्तीपीठ मानले जाते. सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीत आणि सौंदर्याने नटलेल्या परिसरात वसलेले हे मंदिर केवळ धार्मिक स्थळ नसून अध्यात्म, इतिहास आणि निसर्ग यांचा सुंदर संगम आहे.

### पौराणिक महत्त्व

मुकांबिका देवी ही आदिशक्तीचे रूप मानली जाते. पौराणिक कथेनुसार, 'मूकासुर' नावाच्या राक्षसाचा वध करून देवीने भक्तांचे रक्षण केले. म्हणूनच देवीला 'मुकांबिका' हे नाव प्राप्त झाले. येथे देवी त्रिगुणात्मक स्वरूपात महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती विराजमान आहे. त्यामुळे या मंदिराला शक्ती, संपत्ती आणि विद्या यांचे अधिष्ठान मानले जाते. विशेष म्हणजे गर्भगृहात असलेला स्वयंभू ज्योतिर्लिंगासारखा लिंगम आणि त्यावर कोरलेली सुवर्णरेषा शिव आणि शक्तीच्या एकात्मतेचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे येथे शैव आणि शक्त उपासक दोघांचीही मोठी श्रद्धा आहे.

### आदि शंकराचार्यांचा संबंध

आद्य तत्त्वज्ञ आणि संत आदि शंकराचार्य यांनी या मंदिराला विशेष महत्त्व दिले. असे मानले जाते की त्यांनी येथे देवीची मूर्ती प्रतिष्ठापित केली आणि श्रीचक्राची स्थापना केली. त्यामुळे या मंदिराचे धार्मिक स्थान अधिक दृढ झाले आहे. केरळ आणि



कर्नाटकातील अनेक भाविक या मंदिराला अत्यंत पवित्र मानतात.

### निसर्गरम्य परिसर

मंदिराच्या सभोवती घनदाट अरण्य, डोंगररांगा आणि शांत वातावरण आहे. जवळच वाहणारी सौपर्णिका नदी या परिसराच्या पावित्र्यात भर घालते. सह्याद्रीच्या कुशीत वसलेले कोल्लूर गाव वर्षभर हिरवाईने नटलेले असते. त्यामुळे धार्मिक यात्रेबरोबरच येथे येणाऱ्या पर्यटकांना निसर्गसौंदर्याचाही आनंद घेता येतो.

### उत्सव आणि परंपरा

नवरात्रोत्सव हा येथे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या काळात देशभरातून हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात. रथोत्सव, चंडीहोम आणि विविध धार्मिक विधींचे आयोजन केले जाते. तसेच, लहान मुलांच्या शिक्षणाची सुरुवात (विद्यारंभ) करण्यासाठी हे मंदिर विशेष प्रसिद्ध आहे.



अनेक पालक आपल्या मुलांना देवीच्या साक्षीने अक्षरओळख करून देण्यासाठी येथे आणतात.

### सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव

मुकांबिका मंदिराने स्थानिक अर्थव्यवस्था आणि संस्कृतीवर मोठा प्रभाव टाकला आहे. यात्रेकरूंमुळे कोल्लूर परिसरात पर्यटन व्यवसाय, निवासव्यवस्था आणि स्थानिक हस्तकलेला चालना मिळाली आहे. विविध भाषांतील आणि प्रांतांतील लोक येथे एकत्र येतात. त्यामुळे सांस्कृतिक ऐक्याचेही दर्शन घडते.

### प्रवास व सुविधा

कोल्लूर हे उडुपी आणि मंगळुरू शहरांपासून रस्तेमार्गे सहज पोहोचण्यासारखे आहे. मंगळुरू विमानतळ आणि उडुपी रेल्वे स्थानक येथून बस किंवा खासगी वाहनाने मंदिरात पोहोचता येते. मंदिर परिसरात धर्मशाळा, हॉटेल्स आणि भोजनाची व्यवस्था उपलब्ध आहे. मुकांबिका मंदिर हे श्रद्धा, इतिहास आणि निसर्ग यांचे अद्वितीय केंद्र आहे. अध्यात्मिक शांती, सांस्कृतिक वारसा आणि निसर्गसौंदर्य यांचा अनुभव घ्यायचा असेल, तर कोल्लूर येथील मुकांबिका देवीचे दर्शन हा अविस्मरणीय अनुभव ठरतो. हे मंदिर केवळ एक धार्मिक स्थळ नसून भारतीय परंपरेची आणि भक्तीभावाची जीवंत साक्ष आहे.

# कितीही कमावला तरी पैसा हातात टिकत नाही?

## मग घरात या पक्ष्याचा फोटो लावाच, वास्तुशास्त्र काय सांगतं?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वास्तुशास्त्र हे एक असे शास्त्र आहे, ज्यामध्ये केवळ तुमच्या घराची रचना कशी असावी? याबद्दलच माहिती देण्यात आलेली नाही, तर तुम्हाला तुमच्या आयुष्यात, दैनंदिन जीवनात ज्या समस्या भेडसावतात त्या समस्या दूर करण्यासाठी देखील उपाय सांगण्यात आले आहेत. वास्तुशास्त्रामध्ये काही झाडांना अत्यंत शुभ मानण्यात आले आहे. ही झाडे जर तुमच्या घरात असतील तर तुमच्या घरावर लक्ष्मी मातेची कृपा होते, घराला आर्थिक स्थैर्य लाभते आणि पैसा हातात टिकतो, जर कर्ज असेल तर कर्जातून देखील लवकर सुटका होते, असे वास्तुशास्त्रात म्हटले आहे. ज्याप्रमाणे वास्तुशास्त्रामध्ये काही झाडे ही शुभ माण्यात आली आहेत, त्याचप्रमाणे काही पक्षी देखील वास्तुशास्त्रामध्ये अत्यंत शुभ मानण्यात आले आहेत. वास्तुशास्त्रानुसार कितीही पैसा कमावला आणि तो जर तुमच्या हातात टिकत नसेल तर अशा स्थितीमध्ये या पक्ष्याचे छायाचित्र तुमच्या हॉलमध्ये लावणे हे अत्यंत शुभ आहे. यामुळे घराला तर आर्थिक स्थैर्य मिळतेच परंतु कर्जातून देखील तुमची लवकर सुटका होते. चला तर मग जाणून घेऊयात या पक्ष्याबद्दल.

### निळकंठ पक्षी

निळकंठ पक्षाला वास्तुशास्त्रामध्ये अत्यंत शुभ मान्यात आले आहे. निळकंठ पक्ष्याचे दर्शन झाल्यास हे खूप शुभ संकेत असतात. जर पैसा तुमच्या हातात टिकत नसेल आणि तुम्ही कर्जबाजारी झाला असाल तर अशा स्थितीमध्ये निळकंठ पक्ष्याचा फोटो हा तुमच्या हॉलमध्ये लावण्याचा सल्ला वास्तुशास्त्रात देण्यात आला आहे. यामुळे हळूहळू तुमच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होते आणि कर्जातून देखील तुम्हाला लवकर मुक्ती मिळते, असे वास्तुशास्त्रात सांगण्यात आले आहे. एवढेच नाही तर वास्तुशास्त्रामध्ये मोरांच्या पंखांना देखील अत्यंत शुभ माण्यात आले आहे. आर्थिक फायद्यासाठी, नोकरीत किंवा व्यवसायामध्ये यश मिळण्यासाठी मोराचा किंवा मोराच्या पंखाचा फोटो घरात लावण्याचा सल्ला वास्तुशास्त्रामध्ये देण्यात आला आहे.

दुसरीकडे जर पती-पत्नीमध्ये सतत भांडणे होत असतील तर त्यासाठी देखील वास्तुशास्त्रामध्ये एक सोपा उपाय सांगण्यात आला आहे. बेडरूममध्ये लव्ह बर्डचा फोटो ठेवण्याचा सल्ला वास्तुशास्त्रामध्ये देण्यात आला आहे. या फोटोमुळे नात्यातील तणाव दूर होतो आणि विनाकारण भांडणे होत नाहीत, असे वास्तुशास्त्रामध्ये म्हटले आहे.

# सटवाई



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या लोकजीवनात अनेक दैवतांना मानाचे स्थान असते. पण काही देवता या केवळ एखाद्या वेळीच सन्मानाला पात्र ठरतात. एरव्ही त्यांचा नामोल्लेख हा कायमच उपरोधाने होतो. अशीच सर्वांचे दैव लिहिणारी पण स्वतः मात्र या उपरोधाच्या बाबतीत दुर्दैवी ठरलेली देवता म्हणजे सटवाई अर्थात षष्ठी.

षष्ठी अर्थात सटवाई ही मूळ प्रकृतीच्या सहाव्या अंशापासून प्रगट झाली म्हणून तिचे नाव षष्ठी. ती विष्णूमाया रूपिणी आणि ब्रह्मदेवाची मानसकन्या आहे. तिला स्कंद कार्तिकेयाची शक्ती मानतात. बाळाचे दैव लिहिणारी देवी म्हणून तीचा लौकीक आहे. मांजर हे तिचे वाहन आहे. जन्मानंतर पाचव्या रात्री बाळाचे नशीब लिहायला ती येते. महाराष्ट्रात पाचव्या दिवशी सायंकाळी तर गुजरातमध्ये सहाव्या दिवशी षष्ठी पूजन करतात. कृत्य दिवाकर ग्रंथात म्हटल्याप्रमाणे बाळाच्या जन्मानंतर पाचव्या किंवा सहाव्या दिवशी सायंकाळी, रात्रीच्या पहिल्या यामी (दिवसांचा तो प्रहर रात्रीचा तो याम म्हणुन ती यामिनी) बाळाच्या बापाने सुस्नात होऊन देवता स्मरण संकल्पयुक्त असा कलश मांडून त्यावर ताम्हण ठेवावे. त्यात तांदळाचे अष्टदल काढून आठ कोपऱ्यात अनुक्रमे विघ्नेश (गणपती) जन्मदा, जिवंतिका, शस्त्रगर्भा, स्कंद (कार्तिक) राका, अनुमती, सिनीवाली, कुहू, वातघ्नी या देवता सुपारीवर, शस्त्रावर शिशुरक्षिणी आणि मूर्तीवर (चांदी किंवा सोन्याची पुतळी ) यांचे आवाहन करून विघ्नेशादी आवाहित देवताभ्यो नमः असे म्हणून षोडषोपचार पूजन करावे आणि मग प्रार्थना करावी.

संपुज्य क्षेत्रस्याधिपती देवी सर्वारिष्ट विनाशिनी बलीं गृहाण मे रक्ष क्षेत्रे सूतींच बालकम् (अर्थ या जागेची मालकीण असणारे हे देवी हा बली घे आणि या सुतिका घराचे आणि बाळाचे रक्षण कर. येथे बली म्हणजे उडिद घातलेला भात याला अनुसरून कोल्हापूर भागात काही ठिकाणी थेट मुंडी पाय ठेवले जातात. ) त्यानंतर या आवाहित देवांना विनंती करतात.

जननी सर्व भूतानाम् बालानाम्च विशेषतः नारायणी स्वरूपेण बालं रक्ष मे सर्वदा (अर्थात सर्व जीवांना विशेषतः लहान बाळाला आईसारखे सांभाळणारी नारायणी स्वरूप अशी ती सटवाई माझ्या बाळाचे रक्षण करो ).

**ग्रह भूत पिशाच्चेभ्यो डाकीनी योगिनीषुच मातेव रक्ष मे बालं श्वापदे पन्नगेषुच**

**गौरीपुत्रो यथा स्कंदः शिशुत्वे रक्षितः पुरा तथा मप्यायय़ं बालः षष्ठिके रक्ष ते नमः**

( म्ह. हे षष्ठी जसे पूर्वी तू गौरीपुत्र कार्यिकेय बाळ असताना त्याच सर्व संकटातून रक्षण केलस तसे माझ्या या बाळाचे ग्रह भूत पिशाच्च डाकिनी योगिनी जनावर साप नाग यांपासून आई सारखे रक्षण कर )

हा झाला शास्त्रोक्त विधी पण लोकाचारात सुतिका घर म्हणून न्हाणीत शेणाचा गोळा थापून त्यावर सटवाई चिकटवून तिची पूजा केली जाते त्यावेळी तिथे बाळाच्या नशिबात जे जे लिहावे असे वाटते त्या वस्तू उदा.- पाटी-पेन्सील, पेन, पैसे अशा वस्तू पुजल्या जातात ( यावरूनच एखादा माणूस प्रसंग वस्तू सारखी-सारखी आयुष्यात येत असेल तर पाचवीला पुजलेला असा वाक्प्रचार रूढ झाला आहे) काही घरात वरच्या आवाहित देवतांच्या प्रतिनिधी म्हणून पाच कुमारिका पूजन करून त्यांना बाळाला ओलांडून जायला सांगतात. पाचवीच्या पुड्यात असलेल्या ओवा जायफळ मुरडशेंग वावडिंग खारीक बाळंतशेप यांची पूजा करतात. खरेतर ही बाळाला लागणारी रोजची औषधी गुटी आहे. बाळंतिणीला पथ पालटणी ( पथ्यात आहारात बदल)म्हणून पाच भाज्या एकत्र करून खायला घालतात. असा हा पाचवीचा सोहळा. यानंतर बाळ सव्वा महिन्याचे झाले की त्याला सटवाईच्या दर्शनाला नेतात. ही सटवाई कधीही गावाबाहेर असते म्हणून एखादी महिला उच्छृंखल वागत असेल तर तिला सटवी म्हणतात. कोल्हापुरात अशी रानसटवाई हुतात्मा पार्क येथे आहे. खरेतर या बागेचे नाव जुन्या कागदपत्रांत सटवाईची बाग असेच येते.



# सर्वतीर्थ टाकेद येथील प्रसिद्ध जटायू मंदिर..

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हे प्राचीन मंदिर जटायूचे महाराष्ट्रातील एकमेव मंदिर असल्याचे सांगितले जाते. तसेच हे धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व असलेले तीर्थक्षेत्र आहे. याच ठिकाणी श्रीरामाने जमिनीत बाण मारून जटायूसाठी गंगेचे पाणी आणल्याची समजूत प्रचलित आहे. तेव्हापासून हे ठिकाण 'सर्वतीर्थ टाकेद' या नावाने ओळखले जाते.

पुराणातील कथेनुसार, जटायूला गंगेचे पाणी पाजण्यासाठी म्हणून श्रीरामाने जमिनीत बाण मारून गंगेचे पाणी आणले आणि ते जटायूला पाजले. हे पाणी प्यायल्यानंतर जटायूने श्रीरामाच्या मांडीवरच प्राण सोडला. श्रीरामाने बाण मारल्यापासून पाण्याची अखंड धार या ठिकाणी सुरू असल्याचे मानले जाते. ही घटना नाशिक जिल्ह्यातील टाकेद येथे घडली आणि रामाने पृथ्वीवरील सर्व तीर्थांचे पुण्य सामावलेले पाणी येथे आणले. त्यामुळे येथील कुंडाला 'सर्वतीर्थ' असे नामाभिधान प्राप्त झाले.

एका खांबावर जटायूचे मोठे शिल्प आहे आणि त्यासमोर मंदिर आहे. छोटेखानी असलेल्या या मंदिराच्या प्रवेशद्वारावर रक्षकांच्या प्रतिमा आहेत. मंदिरात प्रवेश केल्यावर श्रीराम आणि श्रीरामाच्या मांडीवर प्राण सोडणाऱ्या जटायूच्या मूर्ती पाहावयास मिळतात. जटायू मंदिराच्या समोरच सर्वतीर्थ महाकुंड आहे. या कुंडात स्नान करण्यासाठी व येथील तीर्थ घेण्यासाठी शेकडो भाविक दररोज या ठिकाणी येतात. मंदिराच्या प्रशस्त प्रांगणात श्रीराम, श्रीदत्त, श्रीशंकर आणि श्रीहनुमान यांची मंदिरे आहेत. येथे जटायू मंदिराच्या बाजूला एक शिवपिंड आहे. या शिवपिंडीच्या मधोमध गोलाकार खड्डा असून जमिनीच्या आत, एका हाताच्या अंतरावर शिवलिंग आहे.

# 'सोलापूर-अक्कलकोट हायवे आणि रात्रीचे १२ लुटारू'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ही घटना आहे प्रकाश आणि त्याच्या कुटुंबाची. प्रकाश मुंबईहून अक्कलकोटला स्वामींच्या दर्शनासाठी निघाला होता. सोबत त्याची पत्नी मेघा आणि ७ वर्षांचा मुलगा आर्यन होता. प्रवासात उशीर झाल्यामुळे सोलापूर ओलांडायला त्यांना रात्रीचे १.३० वाजले. अक्कलकोट अजून ४० किलोमीटर दूर होते. रस्ता एकदम सामसूम आणि काळोखात बुडालेला होता. आजूबाजूला फक्त काटेरी झुडपे आणि ओसाड रान होते.

गाडी वेगात होती. अचानक एका वळणावर, प्रकाशला रस्त्याच्या मधोमध मोठे दगड मांडून ठेवलेले दिसले. त्याने जोरात ब्रेक दाबला. कर्ररर..! गाडी दगडांच्या अगदी जवळ जाऊन थांबली. प्रकाशला संशय आला. ही नक्कीच लुटारूंची पद्धत होती. त्याने रिव्हर्स घेण्याचा प्रयत्न केला, पण... गाडीच्या मागच्या काचेवर जोरात फटका बसला.


धडाम! प्रकाशने आरशात पाहिले. गाडीला चारही बाजूंनी ८-१० भयानक माणसांनी घेरले होते. त्यांच्या हातात कोयते, सळ्या आणि लाकडी दांडके होते. त्यांचे चेहरे रुमालाने बांधलेले होते, फक्त क्रूर डोळे दिसत होते. एकाने ड्रायव्हर सीटची काच फोडली. काचांचे तुकडे प्रकाशच्या अंगावर पडले. 'दरवाजा उघड! नाहीतर सगळ्यांना कापून टाकेन!' तो लुटारू ओरडला. मेघा आणि आर्यन भीतीने रडू लागले. प्रकाशने हात जोडले, 'भाऊ, पैसे घ्या, दागिने घ्या, पण आम्हाला मारू नका.'

पण ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. एकाने प्रकाशला कॉलर पकडून बाहेर खेचलं आणि जमिनीवर पाडलं. दुसऱ्याने मेघाच्या



गळ्यातील मंगळसूत्र ओढायला सुरुवात केली. प्रकाश हतबल झाला होता. डोळ्यासमोर मृत्यू दिसत होता. त्याच्याकडे प्रतिकार करायला काहीच नव्हते. त्याने जमिनीवर पडल्या पडल्या, रक्ताळलेल्या हातांनी माती पकडली आणि डोळे मिटून आर्त हाक मारली- 'स्वामी... तुमच्या दर्शनाला आलो होतो, आता तुम्हीच बघा काय ते! अनन्यभावे शरण तुला...' त्या लुटारूंनी प्रकाशवर वार करण्यासाठी कोयता उगारलाच होता. तेवढ्यात... त्या काळोखात, गाडीच्या हेडलाईटच्या प्रकाशात एक विचित्र गोष्ट घडली.

जो लुटारू प्रकाशवर वार करणार होता, त्याचा हात हवेतच थिजला. त्याचे डोळे फाटले. तो प्रकाशच्या मागे बघत होता. त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हते. तो फक्त 'बा... बा... बाप रे!' एवढेच ओरडला. बाकीच्या लुटारूंनीही प्रकाशच्या मागे पाहिले आणि त्यांच्याही हातातले कोयते गळून पडले. जे क्रूर लुटारू मगाशी जीवाची



पर्वा करत नव्हते, ते आता लहान मुलासारखे किंचाळत सैरावैरा पळू लागले. काही जण काटेरी झुडपात पडले, काही जण गाडीला धडकले, पण कोणालाच मागे वळून बघायची हिंमत नव्हती.

अवघ्या १० सेकंदांत सगळे लुटारू गायब झाले. प्रकाशला काहीच कळले नाही. त्याने मागे वळून पाहिले. तेथे कोणीच नव्हते. फक्त ओसाड रस्ता आणि वारा वाहत होता. प्रकाशने घाईघाईने गाडीत बसून गाडी सुसाट पळवली आणि थेट अक्कलकोट पोलीस स्टेशन गाठले. पोलिसांनी प्रकाशची तक्रार नोंदवून घेतली आणि लगेच त्या स्पॉटवर टीम पाठविली. दुसऱ्या दिवशी सकाळी पोलिसांचा प्रकाशला फोन आला. 'साहेब, तुम्ही नशीबवान आहात! आम्ही त्या टोळीतल्या दोघांना पकडले आहे. ते अट्टल गुन्हेगार आहेत, त्यांनी अनेक खून केले आहेत.' प्रकाशने विचारले, की 'पण साहेब, ते पळून का गेले? माझ्याकडे तर काहीच हत्यार नव्हते.' पोलिसांनी जे उत्तर दिले, ते ऐकून प्रकाशच्या पायाखालची जमीन सरकली. इन्स्पेक्टर म्हणाले, की 'आम्ही त्यांना हेच विचारले. तर ते थरथर कापत म्हणाले, की जेव्हा ते तुमच्यावर वार करणार होते तेव्हा तुमच्या गाडीच्या छतावर त्यांना एक १० फुटांचा, धिप्पाड, जटाधारी माणूस उभा असलेला दिसला. त्याचे डोळे आगीसारखे लाल होते आणि हातात एक प्रचंड त्रिशूळ होते. त्याने फक्त एकदा हुंकार भरली, तर त्या लुटारूंचे कान बधीर झाले. त्यांना वाटले तो 'राक्षस' त्यांना खाऊन टाकेल, म्हणून ते जीव वाचवून पळाले.' प्रकाशला आठवले, त्या क्षणी तेथे कोणीच नव्हते... पण तरीही तेथे 'कोणीतरी' होते. ज्या मातीवर प्रकाशने डोकं टेकलं होतं, ती साधी माती नव्हती, तर ती भक्ताच्या रक्षणासाठी आलेली स्वामींची साक्ष होती. तुम्ही एकटे आहात, असे तुम्हाला वाटते तेव्हा तुमची सर्वात मोठी चूक असते. कारण स्वामींची 'सावली' नेहमीच तुमच्या डोक्यावर असते, फक्त ती संकटाच्या वेळीच 'दृष्टी'स पडते.

**|| अशक्यही शक्य करतील स्वामी ||**